# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

## दिनांकः23.07.2025 वारःबुधवार

---

- पंतप्रधान नरेंद्र मोदी आज ब्रिटन आणि मालदीवच्या दौऱ्यावर रवाना होणार
- संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये कालही कामकाज दिवसभरासाठी तहकूब
- २००६च्या मुंबई उपनगरी रेल्वे बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व आरोपींच्या निर्दोष मुक्ततेच्या उच्च न्यायालयाच्या निर्णयाला महाराष्ट्र राज्य सरकारचं सर्वोच्च न्यायालयात आव्हान
- आज आकाशवाणीचा राष्ट्रीय प्रसारण दिन
- आणि
- महिलांच्या क्रिकेटमध्ये भारताचा इंग्लंडवर २-१ असा विजय

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज ब्रिटन आणि मालदीवच्या दौऱ्यावर रवाना होत आहेत. दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात पंतप्रधान मोदी ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्यासमवेत द्विपक्षीय चर्चा करणार आहेत; तसंच ब्रिटनचे राजे चार्ल्स यांचीही ते भेट घेतील, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव विक्रम मिस्री यांनी काल नवी दिल्लीत बातमीदारांना सांगितलं. दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात पंतप्रधान मोदी मालदीवच्या दौऱ्यावर जाणार आहेत. २६ जुलैला मालदीवच्या ६०व्या स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून ते उपस्थित राहणार आहेत. या भेटीत पंतप्रधान मोदी मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोईज्जु यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत, असं मिस्री यांनी सांगितलं.

**<u>सं</u>**सद

संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये कालही विविध मुद्द्यांवरून गदारोळ झाला; त्यामुळे कामकाज आधी दोनवेळा आणि त्यानंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. लोकसभेत सभापती ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तरांचा तास सुरू केल्यावर विरोधी पक्षांच्या सदस्यांनी ऑपरेशन सिंदूर आणि बिहारमधलं मतदार याद्यांचं सखोल पुनरिक्षण या विषयांवर चर्चेची मागणी करत घोषणाबाजी सुरु केली. राज्यसभेतही विविध मुद्द्यांवरून झालेल्या गदारोळामुळे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करावं लागलं.

**<u>उच्चन्यायालयआव्हान</u>**

मुंबईत उपनगरी रेल्वेगाड्यांमध्ये २००६मध्ये झालेल्या बॉम्बस्फोट खटल्यातल्या सर्व १२ आरोपींना निर्दोष मुक्त करण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला महाराष्ट्र राज्य सरकारनं सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. त्यावर उद्या म्हणजे २४ जुलै रोजी सुनावणी होणार आहे. उच्च न्यायालयानं या प्रकरणातील सर्व आरोपींबाबतचा सत्र न्यायालयाचा निकाल रद्द करून त्यांची तातडीनं सुटका करण्याचे आदेश सोमवारी दिले आहेत.

**<u>सर्वोच्चन्यायालय</u>**

विधिमंडळांनी संमत केलेल्या विधेयकावर स्वाक्षरी करण्यासाठी राष्ट्रपती किंवा राज्यपालांना कालावधी निश्चित करुन देणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्याबाबत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दिलेलं विचारणा पत्र सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीला घेतलं आहे. सर्वोच्च न्यायालयाने काल त्यावर केंद्र आणि सर्व राज्य सरकारांना नोटिसा जारी केल्या. तमिळनाडू विधानसभेने संमत केलेल्या विधेयकांवर स्वाक्षरी करायला राज्यपालांनी विलंब केल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं हा निवाडा दिला होता. विधीमंडळानं संमत केलेलं विधेयक राज्यपालांनी पुनर्विचारासाठी परत पाठवल्यानंतर विधिमंडळात दुसऱ्यांदा संमत होउन आलं; तर ते राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवता येणार नाही. तसंच या विधेयकावर ३ महिन्यांच्या मुदतीत कार्यवाही झाली नाही तर राज्यपालांची संमती गृहित धरली जाईल असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं होतं. या निकालासंदर्भात संवैधानिक तरतुदींचा सल्ला मागणारं पत्र राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी घटनेच्या कलम १४३ नुसार सर्वोच्च न्यायालयाला पाठवलं आहे.

**<u>मुख्यमंत्रीगडचिरोली</u>**

पोलाद निर्मितीचं केंद्र होण्याच्या दिशेनं गडचिरोलीची वाटचाल सुरू असून या उद्योगातून इथल्या सामान्य नागरिकांच्या जीवनात परिवर्तन घडत आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केलं. गडचिरोली जिल्ह्यातील कोनसरी इथं लॉयड्स मेटल्स अ‍ॅण्ड एनर्जी लिमिटेडच्या एलएमईएल विविध प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाली; त्यावेळी ते बोलत होते. गडचिरोलीच्या नैसर्गिक संपत्तीचा विनाश न करता विकास साधण्याला सरकारचं प्राधान्य असेल; पुढील काही वर्षात गडचिरोली राज्यातील पहिल्या क्रमांकाचा जिल्हा होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमानंतर माध्यमांशी संवाद साधताना ते म्हणाले.....

बाईट – मुख्यमंत्री

हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या अभियानांतर्गत गडचिरोली जिल्ह्यातील एक कोटी वृक्ष लागवडीचा प्रारंभही काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आला.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची आज जयंती आहे यानिमित्त पुण्यासह राज्यात विविध ठिकाणी त्यांना अभिवादन करण्यात येत असून विविध उपक्रमांच आयोजन करण्यात आल आहे

हे**<u>लिकॉप्ट</u>**

भारतीय लष्करासाठी एक महत्त्वाचा टप्पा म्हणून, अपाचे हेलिकॉप्टरची पहिली तुकडी काल अमेरिकेतून भारतात पोहोचली. अपाचे हेलिकॉप्टरचे आगमन हे देशाच्या संरक्षण क्षमता मजबूत करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे, असं मत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केलं. क्षेपणास्त्र हल्ला करण्याच्या प्रभावी क्षमतेमुळे या अत्याधुनिक हेलिकॉप्टरना युद्धभूमीवर हवेतील रणगाडे असं संबोधलं जातं.

**<u>राष्ट्रीयप्रसारणदिन</u>**

आज राष्ट्रीय प्रसारण दिन आहे. १९२७ मध्ये याच दिवशी, देशातील पहिले रेडिओ प्रसारण मुंबई स्टेशनवरून इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनीच्या अंतर्गत सुरू झाले. ८ जून १९३६ रोजी, भारतीय राज्य प्रसारण सेवा ऑल इंडिया रेडिओ मध्ये रुपांतरित झाली. ऑगस्ट १९३७ मध्ये केंद्रीय वृत्तसंस्था अस्तित्वात आली. १९५६ मध्ये आकाशवाणी हे नाव स्वीकारण्यात आले. १९५७ मध्ये विविध भारती सेवा सुरू करण्यात आली.१९२७ पासून, रेडिओ हा देशातील लोकांच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग असून बहुजन हिताय, बहुजन सुखाय या आपल्या ब्रीदवाक्यानुसार आकाशवाणी जनसामान्यांना माहिती देत, त्यांचे प्रबोधन आणि मनोरंजन करण्याचे कार्य करत आहे.

**<u>प्रसारभा</u>**रती

प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि आशिया-पॅसिफिक इन्स्टिट्यूट फॉर ब्रॉडकास्टिंग डेव्हलपमेंटच्या जनरल कॉन्फरन्स चे अध्यक्ष गौरव द्विवेदी यांनी काल कंबोडियात झालेल्या २० व्या आशिया माध्यम परिषदेत वेव्हज ओटीटी प्लॅटफॉर्मवर सादरीकरण केले. वेव्हज प्लॅटफॉर्म केवळ वापरकर्त्यांनाच नव्हे तर संस्था आणि धोरणकर्त्यांना देखील सामग्री शोधण्यास मदत करतो.तसंच सार्वजनिक सेवा प्रसारकांनी वैयक्तिक प्लॅटफॉर्म विकसित करण्याऐवजी एकत्र काम करणे हा सर्वोत्तम उपाय आहे,असंही द्विवेदी म्हणाले.

**<u>नौदल</u>**

भारतीय नौदल आज नवी दिल्लीत एक दिवसीय जहाजबांधणी चर्चासत्राचे आयोजन करणार आहे. जहाजबांधणीद्वारे राष्ट्रबांधणी या विषयावर होणाऱ्या या चर्चासत्रात भारतीय नौदल, शिपयार्ड, जहाज उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्रातील प्रमुख भागधारकांचा सहभाग असणार आहे. या कार्यक्रमात जहाजबांधणीशी संबंधित विविध धोरणात्मक पैलूंवर चर्चा करण्यात येईल.

**जम्मू-काश्मीर**

जम्मू आणि काश्मीरमध्ये दहशतवादामुळं उद्धस्त झालेल्या कुटुंबांना मदत करण्यासाठी एक वेब पोर्टल सुरू करण्यात आलं आहे. नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी काल या पोर्टलचं उद्घाटन केलं. या उपक्रमामुळे दहशतवादाने त्रस्त झालेल्यांना मदत देण्याची प्रक्रिया सुलभ आणि वेगवान होईल. या पोर्टलवर जिल्ह्यानुसार आकडेवारी नोंदवली जाईल, मदत प्रयत्नांचा मागोवा घेतला जाईल. आर्थिक मदत,

सानुग्रह अनुदान आणि अनुकंपापूर्ण रोजगार उपलब्ध करणं हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. पीडितांच्या मालमत्तेवरील अतिक्रमणांचीदेखील नोंद केली जाईल. निराकरण न झालेल्या किंवा प्रलंबित दाव्यांसाठी जम्मू आणि काश्मीरमध्ये मोफत हेल्पलाइनही सुरू करण्यात आल्या आहेत.

**सिकलसेल**

राष्ट्रीय सिकलसेल मिशन अंतर्गत एकूण सहा कोटी व्यक्तींची सिकलसेल आजारासाठीची तपासणी करण्यात आली आहे. यापैकी दोन लाख १५ हजार व्यक्तींना या आजाराचे निदान झाले आहे आणि १६ लाखांहून अधिक वाहकांची ओळख पटवण्यात आली आहे. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या मते, मध्य प्रदेश, गुजरात, राजस्थान, तेलंगणा, कर्नाटक आणि उत्तराखंड या राज्यांनी त्यांच्या लक्ष्यांच्या तुलनेत लक्षणीय प्रगती दर्शविली आहे. निदान झालेल्या प्रकरणांची सर्वाधिक संख्या ओडिशा, छत्तीसगड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात या राज्यांमध्ये नोंदवली गेली आहे.

**महिलाक्रिकेट**

तीन सामन्यांच्या महिला एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट मालिकेतील शेवटच्या सामन्यात काल भारतानं इंग्लंडचा १३ धावांनी पराभव केला आणि मालिका २-१ अशी जिंकली. नाणेफेक जिंकल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघानं दमदार फलंदाजी करत, निर्धारित ५० षटकांत ५ बाद ३१८ धावा केल्या आणि यजमान इंग्लंडसाठी ३१९ धावांचं लक्ष्य ठेवलं. भारताची कर्णधार हरमनप्रीतने ८४ चेंडूत १०२ धावा केल्या. या आधी दोन्ही संघांनी प्रत्येकी एक एक सामना जिंकल्यानं हा अंतिम सामना अतिशय चुरशीचा झाला. इंग्लंडच्या संघाला ४९ षटकं आणि पाच चेंडूत ३०५ धावा करता आल्या. भारताच्या क्रांती गौडनं सहा बळी घेतले. हरमनप्रीतच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तिला सामनावीर आणि मालिकावीर घोषित करण्यात आलं.

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतील चौथा सामना आज मँचेस्टरमधील ओल्ड ट्रॅफर्ड इथं होणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार दुपारी ३:३० वाजता सुरू होईल. या मालिकेत भारत १-२ नं पिछाडीवर आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**